क्र.२/नसवि/महासभा/ ०३ /२०१२-२०१३
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०४ जून २०१२

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०३ /२०१२-२०१३

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक १२/०६/२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील दि.२९/०३/२०१२ ची तहकुब दि.३१/०३/२०१२ रोजीची विशेष सभा व दि.१९/०५/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका सि.स.नं. २४४/१ या जमिनीमधून सांगली शहराच्या मंजुर विकास योजनेतील ८० फुटी रस्त्याने बाधित होणाऱ्या क्षेत्राची नुकसान भरपाईचा हक्क साबूत ठेवून जमिन मालक यांनी संमत्ती दिली होती. सदर रस्त्याचे बाधित क्षेत्र सन १९८९ साली ताब्यात देण्यात आली आहे. सन १९८९ चे मुल्यांकन गृहीत धरल्यास अर्जदार यांना बँक व्याजाप्रमाणे व्याज दयावे लागणार असल्याने, त्यामुळे महापालिकेचे नुकसान होणार असल्याने, प्रस्तुत कामी सन २००८ चे शिघ्रसिद्धगणकानुसार १२७१ चौ.मी. या जागेची नुकसान भरपाई रु.१०,०२,८७६/- इतकी होत असून, पहिल्या टप्प्यात ५०% नुकसान भरपाई आदा करणेस व उर्वरित रक्कम सहा.संचालक नगररचना यांचेकडून मुल्य निर्धारण करुन आदा करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव महासभेकडे दि.०५/०८/२०१० रोजी सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.महासभा ठराव क्र.१२५ दि.२०/०४/२०१० अन्वये महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता. सदरची जागा संपादन करणेस उचित वाटत नाही असे नमुद करुन सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणेत आलेला होता. त्यावर स.नं.२४४/१ या मिळकतीचे मालक श्री.पाटील यांनी मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र यांचकडे नुकसान भरपाईची रक्कम देण्यास महापालिका टाळाटाळ करीत असलेची तक्रार केली होती. मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र यांनी प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी घेवून अशा प्रकारे विषय तहकूब करणे म्हणजे बाधित व्यक्तींना जाणून-बुजून त्रास देण्यासारखे आहे असे मत व्यक्त करुन, नुकसान भरपाईची रक्कम देणेची त्वरीत कार्यवाही करणेचे आदेश देवून पुढील सुनावणी दि.१०/१०/२०१२ रोजी ठेवली आहे. प्रस्तुत विषय मा.लोक आयुक्त संदर्भित असल्याने श्री.भिमराव गोविंद पाटील यांना नुकसान भरपाईची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबत **सहा.संचालक नगररचना यांचे दि.०१/०६/२०१२ रोजीचे विषयपत्र. (सदरचा विषय मा.महासभा ठ.क्र.१२५ दि.२०/१०/२०१० अन्वये प्रलंबित ठेवणेत आला आहे.)**

... २ ...

५. सांगली येथील सि.स.नं.२२१/१ मधील ६० फुट (१८.३०मी.) नियोजित रस्ता संपादन करुन घेवून रस्त्याने बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई मिळणेबाबत श्रीमती इंदूताई कृष्णा जाधव तर्फे मुखत्यार श्री.अवधूत कृष्णा जाधव यांनी मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे विनंती केली होती. त्याबर मा.लोक आयुक्त यांनी सुनावणी घेवून तक्रारदार श्री.जाधव यांना नुकसान भरपाई भूसंपादन प्रस्तावाद्वारे अथवा खाजगी वाटाघाटीने घेणेस तयार असतील तर संबंधीतांना त्यापद्धतीने नुकसान भरपाई आदा करणेत यावी असे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने श्री.जाधव यांना दि.२९/०५/२०१० व दि.२४/०५/२०११ अन्वये रस्त्याने बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई खाजगी वाटाघाटीने घेण्यास तयार असल्यास विनंती अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करणेबाबत कळविले होते. त्यास त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही व जमिन भूसंपादनाद्वारे संपादन करुन नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. स.नं.२२१/१ पैकी ६० फुट (१८.३०मी.) रस्त्याने बाधित क्षेत्र ३९०३ चौ.मी.होते. विषयांकीत रस्ता संयुक्त रि.स.नं. मधून प्रस्तावित असल्याने व काही रि.स.नं. मधील मिळकत धारकांना खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई अदा केली असल्याने, अर्जदार श्री.जाधव यांचे क्षेत्रापुरता फेर दुरुस्त भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे आहे. तथापि, मा.लोकआयुक्त यांचे समोर झालेल्या सुनावणी अनुषंगाने अर्जदार श्री.जाधव यांचे रि.स.नं.२२१/१ मधील क्षेत्रापुरताच भूसंपादनाचा फेर प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०४/०६/२०१२ चे विषयपत्र.**

६. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

७. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- 34

विषय क्रमांक :- ०१

विशेष सभा दि. २९/०३/२०१२ ची तहकुब दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. २३९ सर्वसाधारण महासभा दि.१९/०५/२०१२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. १८ ते ठराव क्र. ३४ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. अर्थसंकल्पीय विशेष महासभेच्या ठराव क्र.२३९ मध्ये अर्थसंकल्पात सन्माननीय सदस्यांनी सुचविलेली बायनेम कामे वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रशासनाने दिनांक ३० जून, २०१२ पर्यंत विशेष अभियान राबवून सदरची कामे वेळेत पूर्ण करणेची कार्यवाही ठेवावी अशी दुरुस्ती करुन सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- Kerron

अनुमोदक :-

कार्यवृत्त सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्यालय अधिक्षक (अ.स)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :-१२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ३६

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचे ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.देवेंद्र जाधव यांच्या पत्नी सौ.सुश्मिता देवेंद्र जाधव यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :-१२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ३७

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचे ठराव

सद्गुरु पंडित वामनराव पै यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विजयकुमार हाबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ३८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने ज्येष्ठ नेते व सोनहिरा साखर कारखान्याचे अध्यक्ष मा.मोहनरावजी कदम यांना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार जाहिर करण्यात आला. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.मोहनरावजी कदम यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.बिरेंद्र थोरात

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

उपायुक्त/सहा.आयुक्त

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ३९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी मा.श्री.विलासराव शिंदे, शहर अध्यक्षदी मा.महापौर इद्रिस नायकवडी तसेच, सांगली विधानसभा अध्यक्षपदी मा.श्रीनिवास पाटील यांची बिनविरोध निवड करणेत आली. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.श्री.विलासराव शिंदे, मा.महापौर इद्रिस नायकवडी, मा.श्रीनिवास पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.बिरेंद्र थोरात

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४०

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

बासरीवर धृपशैली परिपूर्णरित्या साकारण्यासाठी कला आणि शास्त्राचा अद्‌भूत मिलाफ घडवून आणत सांगलीचे सुपूत्र श्री.समीर इनामदार यांनी नाविन्यपूर्ण बासरीची निर्मिती केली आहे. त्यांनी बनविलेल्या बासरीची दोन पेटंटस् दाखल करण्यात आली असून, लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्मध्येही बासरीची नोंद झाली आहे. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.समीर इनामदार यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहायक आयुक्त

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

विश्वजागृती मंडळाच्या वतीने प्रतिवर्षी दिला जाणारा सांगली भूषण पुरस्कार यंदा प्रख्यात विधीतज्ञ व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे माजी अध्यक्ष ॲड.श्री.शशिकांत पागे यांना देण्यात आला. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा ॲड.श्री.शशिकांत पागे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.दिग्विजय सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रभारी स्थानीय अधिकारी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

भारताचा महान फलंदाज आणि क्रिकेट विश्वामध्ये अव्वल स्थान प्राप्त करणाऱ्या मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर याला अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनीयाजी गांधी व पंतप्रधान मनमोहनसिंग तसेच काँगेसच्या सर्वच खासदारांनी एकमुखी निर्णय घेवून जगामध्ये भारताचे नाव सर्वोच्च पदावर नेणाऱ्या सचिन तेंडूलकरला भारताच्या सर्वोच्च ठिकाणी राज्य सभेवरती खासदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली खऱ्या अर्थाने क्रिकेट आणि खेळावरती प्रेम करणारी कोटयावधी क्रिडा प्रेमींना एक आनंददायी धक्काच बसला. काँग्रेस पक्षाने सचिन तेंडूलकरचे यथोचित गौरव केला. वयाच्या ४२ व्या वर्षीही चौकार षटकार मारणारा सचिन यशस्वी क्रिकेटपटू म्हणून आज संपूर्ण विश्व त्यांचेकडे पाहतो नूतन खासदार म्हणून सचिन तेंडूलकर यांचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.लक्ष्मण नवलाई

अनुमोदक :- मा.प्रमोद सुर्यवशी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

नुकतेच भारताचा बुद्धीबळपटू विश्वनाथन आनंद सलग पाचव्यांदा यश संपादन करुन विश्वविजेतेपद खेचून आणला. साहजिकच विश्वनाथनने स्वताच्या संयमी शांत स्वभावाच्या विचाराने आणि तेवढ्याच प्रखरतेने जिद्द व चिकाटीने मी डबल हॅट्रीक करु शकतो हे संपूर्ण विश्वाला दाखवून दिले. विश्वनाथन आनंदला नक्कीच ईश्वराची कृपादृष्टी आहे म्हणून त्यांच्या नावातच देवपण आहे. सलग पाचव्यांदा विजय प्राप्त करणे हे एवढे सोपे कार्य नाही. नजीकच्या काळात आनंदने डबल हॅट्रीक करावे याच शुभेच्छा या सोनेरी विजयाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा विश्वनाथन आनंद यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.लक्ष्मण नवलाई

अनुमोदक :- मा.प्रशांत पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

समाजाच्या उन्नतीसाठी सतत झटणारे तसेच सदैव कार्यरत असणारे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन्मा.सदस्य श्री.प्रशांत विजयकुमार पाटील (मजलेकर) यांची दक्षिण भारत जैन सभेच्या शेठ रा.ध.दावडा दिगंबर जैन बोर्डिंगच्या अध्यक्षपदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा सन्मा.सदस्य श्री.प्रशांत विजयकुमार पाटील (मजलेकर) यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.प्रमोद सुर्यवशी

अनुमोदक :- मा.विशाल कलगुटगी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

सांगलीची कु.शरयु अविनाश कांबळे हिने अभियांत्रिकी विश्वातील कठीण व सत्वपरिक्षा बघणारी परिक्षा म्हणजे आयआयटी-जेईई या परिक्षेत उर्तीण होवून देशात १६४५ हा क्रमांक मिळविला आहे. तिच्या या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा कु.शरयु अविनाश कांबळे हिचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवशी

अनुमोदक :- मा.दिग्विजय सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १२/०६/२०१२

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- ४६

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे सहा.संचालक नगररचना यांचे दि.०१/०६/२०१२ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिका सि.स.नं. २४४/१ या जमिनीमधून सांगली शहराच्या मंजुर विकास योजनेतील ८० फुटी रस्त्याने बाधित होणाऱ्या क्षेत्राची नुकसान भरपाईच्या हक्क साबूत ठेवून जमिन मालक यांनी संमत्ती दिली होती. सदर रस्त्याचे बाधित क्षेत्र सन १९८९ साली ताब्यात देण्यात आली आहे. सन १९८९ चे मुल्यांकन गृहीत धरल्यास अर्जदार यांना बँक व्याजाप्रमाणे व्याज दयावे लागणार असल्याने, त्यामुळे महापालिकेचे नुकसान होणार असल्याने, प्रस्तुत कामी सन २००८ चे शिघ्रसिद्धगणकानुसार १२७१ चौ.मी. या जागेची नुकसान भरपाई रु.१०,०२,८७६/- इतकी होत असून, पहिल्या टप्प्यात ५०% नुकसान भरपाई आदा करणेस व उर्वरित रक्कम सहा.संचालक नगररचना यांचेकडून मुल्य निर्धारण करुन आदा करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव महासभेकडे दि.०५/०८/२०१० रोजी सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.महासभा ठराव क्र.१२५ दि.२०/०४/२०१० अन्वये महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता. सदरची जागा संपादन करणेस उचित वाटत नाही असे नमुद करुन सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणेत आलेला होता. त्यावर स.नं.२४४/१ या मिळकतीचे मालक श्री.पाटील यांनी मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र यांचकडे नुकसान भरपाईची रक्कम देण्यास महापालिका टाळाटाळ करीत असलेची तक्रार केली होती. मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र यांनी प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी घेवून अशा प्रकारे विषय तहकूब करणे म्हणजे बाधित व्यक्तींना जाणून-बुजून त्रास देण्यासारखे आहे असे मत व्यक्त करुन, नुकसान भरपाईची रक्कम देणेची त्वरीत कार्यवाही करणेचे आदेश देवून पुढील सुनावणी दि.१०/१०/२०१२ रोजी ठेवली आहे. प्रस्तुत विषय मा.लोक आयुक्त संदर्भित असल्याने श्री.भिमराव गोविंद पाटील यांना मा.लोक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे आदेशानुसार नुकसान भरपाईची रक्कम आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तथापि, इतर मालकी हक्क सदरातील असणाऱ्या हिस्सेदारांची संम्मती घेणेची तजवीज ठेवावी.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४७

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०४/०६/२०१२ चे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली येथील सि.स.नं.२२१/१ मधील ६० फुट (१८.३०मी.) नियोजित रस्ता संपादन करुन घेवून रस्त्याने बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई मिळणेबाबत श्रीमती इंदूताई कृष्णा जाधव तर्फे मुखत्यार श्री.अवधूत कृष्णा जाधव यांनी मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे विनंती केली होती. त्यावर मा.लोक आयुक्त यांनी सुनावणी घेवून तक्रारदार श्री.जाधव यांना नुकसान भरपाई भूसंपादन प्रस्तावाद्वारे अथवा खाजगी वाटाघाटीने घेणेस तयार असतील तर संबंधीतांना त्यापद्धतीने नुकसान भरपाई आदा करणेत यावी असे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने श्री.जाधव यांना दि.२९/०५/२०१० व दि.२४/०५/२०११ अन्वये रस्त्याने बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई खाजगी वाटाघाटीने घेण्यास तयार असल्यास विनंती अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करणेबाबत कळविले होते. त्यास त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही व जमिन भूसंपादनाद्वारे संपादन करुन नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. स.नं.२२१/१ पैकी ६० फुट (१८.३०मी.) रस्त्याने बाधित क्षेत्र ३९०३ चौ.मी.होते. विषयांकीत रस्ता संयुक्त रि.स.नं. मधून प्रस्तावित असल्याने व काही रि.स.नं. मधील मिळकत धारकांना खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई अदा केली असल्याने, अर्जदार श्री.जाधव यांचे क्षेत्रापुरता फेर दुरुस्त भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे आहे. तथापि, मा.लोकआयुक्त यांचे समोर झालेल्या सुनावणी अनुषंगाने अर्जदार श्री.जाधव यांचे रि.स.नं.२२१/१ मधील क्षेत्रापुरताच भूसंपादनाचा फेर प्रस्ताव पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण मंडळ) यांचे दि.०६/०६/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडे एकतर्फी अंतर जिल्हा बदली होणेसाठी जिल्हा परिषद औरंगाबाद मधून श्री.संजय तुकाराम माळी (सहा.शिक्षक), श्रीमती कल्पनाताई ईश्वरा माळी (सहा.शिक्षीका मराठी माध्यम) आणि जिल्हा परिषद रत्नागिरी येथून श्रीमती नुजहत निसार अहमद पटेल (सहा.शिक्षीका उर्दु माध्यम) यांचे प्रस्ताव महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडे प्राप्त झालेले आहेत. महापालिका शिक्षण मंडळाकडे मराठी माध्यमाची १६० पदे आणि उर्दु माध्यमाची ६३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी काही शिक्षक सेवानिवृत्त झालेने मराठी माध्यमाची ०४ व उर्दु माध्यमाची ०४ पदे रिक्त आहेत.

दिनांक १९/०५/२०१२ रोजीच्या महासभेमध्ये अशा प्रकारच्या एकतर्फी अंतर जिल्हा बदलीचे प्रस्ताव सादर करणेस मा.महासभेने मान्यता दिली असल्याने, प्राथमिक शिक्षण मंडळाकडे रिक्त असलेल्या पदावर श्री.संजय तुकाराम माळी (सहा.शिक्षक), श्रीमती कल्पनाताई ईश्वरा माळी (सहा.शिक्षीका मराठी माध्यम), श्रीमती नुजहत निसार अहमद पटेल (सहा.शिक्षीका उर्दु माध्यम) यांची एकतर्फी अंतर जिल्हा बदली महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडे करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kadam

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासन अधिकारी (प्राथ. मंडळ)

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ४९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज शहरात दरवर्षीप्रमाणे दि.१५/०६/२०१२ रोजी हजरत ख्वॉजा शमशुद्दीन शमना मिरासाहेब उरुस सुरु होत आहे. या काळात याच परिसरात असणाऱ्या मिरज हायस्कूल, मिरज या ठिकाणी मिरज हायस्कूलच्या जून्या पाडणेत आलेल्या शाळा इमारतीच्या ठिकाणी मोकळ्या जागेचा गैरवापर उरुस काळात होण्याची शक्यता असल्याने जागेचा गैरवापर होवू नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे असे या सभेचे मत आहे. या जागेत पाळणे व खेळणी लावणेसाठी श्री.जावेद नुरमहंमद आगा यांनी मागणी केलेली आहे. त्याचे मागणीचा विचार करुन त्यांना ही जागा पाळणे व खेळणी लावणेसाठी दिलेस जागेचा उरुस काळातील गैरवापर टळूण महापालिकेला आर्थिक उत्पन्नही मिळेल असे या सभेचे मत आहे. श्री.आगा यांनी उरुस कालावधीसाठी रु.१लाख मात्र जागा भाडे देणेची तयारी दर्शविली आहे. त्याचा विचार करता महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने सदरची जागा उरुस कालावधी मध्ये किमान रु.२लाख मात्र भाडे आकारणी करुन श्री.आगा यांना दि.१४ जून ते दि.२४ जून या कालावधीत पाळणे व खेळणी लावणेस जागा भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत असून, सदरची जागा उरुस कालावधी मध्ये बंदिस्त करावी जेणेकरुन त्याचा उपद्रव हायस्कूलला होणार नाही याची दक्षता घ्यावी असे ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

माननीय आयुक्त व
मुख्याधिकारी मिरज हायस्कूल

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.११/०६/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या मिरज येथील पंप हाऊस आवारातील स्टाप क्वॉर्टर इमारत ही सुमारे ४० वर्षापुर्वी बांधलेली इमारत आहे. सदर स्टाप क्वॉर्टर इमारतीमध्ये मनपा कर्मचारी श्री.जार्लीदर कोंडीबा सावंत हे रहात होते. तसेच या इमारतीमध्ये महापालिकेचे आर.सी.एच.सेंटर ही कार्यरत होते. सदर इमारतीचे बांधकाम धोकादायक झालेने इमारत केंव्हाही पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सदर धोकादायक इमारतीपासून कोणत्याही प्रकारची जिवित वा वित्त हानी होवू नये यासाठी सदर धोकादायक इमारतीचे बांधकाम तातडीने उतरुन घेणे आवश्यक आहे असे या सभेचे मत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ मधील तरतुदीनुसार या धोकादायक इमारती मध्ये रहात असलेले मनपा कर्मचारी यांना इतरत्र हालविणेत आले असून, आर.सी.एच.सेंटर स्थलांतरीत करणेत आले असल्याने सदर धोकादायक इमारतीचे बांधकाम तातडीने उतरुन घेणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मा.हरिदास पंडित पाटील यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगलीवाडी येथील त्रिकोणी बागेच्या दक्षिण बाजूस सद्या दरवाजा आहे. त्याठिकाणी मनपाच्या वतीने खोक्यांचे पुर्नवसन करण्याचे वाहतुकीच्या दृष्टीने योग्य होणार आहे म्हणून सांगलीवाडी येथील त्रिकोणी बागेच्या दक्षिण बाजूचा दरवाजा बंद करुन, पश्चिम बाजूस असणारी कंपौंड वॉल दरवाजापुरती पाडून त्याठिकाणी दरवाजा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Keerthy

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०५/०६/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या सांगली येथील स.नं.२४२/१/ब या जमिनीमधील मंजूर विकास योजनेतील ८० फुट रुंद रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्राची नुकसान भरपाई मिळणेबाबत अर्जदार श्री.भाऊदाजी शेळके यांनी दि.२०/०५/२०११ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे. या मिळकतीचा ७/१२ उतारा पहाता मिळकतीचे क्षेत्र ०.५६ हे.आर. इतके आहे. तसेच, सदर उताऱ्यावर मायाक्का तुकाराम येरकर यांचे नावाची नोंद दिसून येते. ८० फुटी रस्ता रुंदीने बाधीत होणारे सरासरी क्षेत्र १४३९.९६ चौ.मी. असून, तेवढ्या क्षेत्राचा मोबदला अर्जदार यांना अपेक्षित आहे. मा.संचालक नगररचना महाराष्ट्र राज्य पूणे यांचेकडील मार्गदर्शक तत्वानुसार विकास योजनेतील रस्त्याने बाधीत होणाऱ्या संपूर्ण क्षेत्राचा मोबदला जमिन मालकास देणे उचित होणार नाही. त्याच प्रमाणे विकास योजनेतील प्रस्तावीत ८० फुट रस्ता हा रेल्वे लाईनच्या बाजूने जात असल्याने, रेल्वे हद्दीपासून ९मी.सेटबॅक सोडणे आवश्यक असल्याचे या सभेचे मत आहे.

सन २०११ चे शिघ्रसिद्धगणकानुसार बाधीत क्षेत्राचे मुल्यांकन १०७१.१६ चौ.मी.साठी रु.१४,७०,३६४/- इतके होत असून, रु.१४,७०,३६४/- मधून ६% मुद्रांक शुल्कची र.रु.८८,२२२/- मात्र वजा जाता रु.१३,८२,२४२/- होत आहे. त्यापैकी जमिनधारकांना ५०% रक्कम प्रथम आदा करुन उर्वरित रक्कम सहा.संचालक नगररचना, शाखा सांगली यांचेकडून मुल्यांकन करुन घेवून जमिनीचे रितसर खरेदीपत्र, कब्जेपट्टी पूर्ण करुन घेवून मालकी हक्कासदरी ७/१२ उतारा अथवा मिळकत पत्रिका उताऱ्यावर महापालिकेची नावाची नोंद झाल्यानंतर तसेच खरेदी पत्राच्या अनुषंगाने अथवा कब्जेपट्टीद्वारे होणारे हस्तांतरण यासाठी होणारा स्टॅम्प ड्युटी खर्च जमिनधारकांनी करणेच्या अटीवर नुकसान भरपाई अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Keerron

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- MKS

महापौर,

स.स.न.र

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.११/०६/२०१२ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.शासनाकडून १३ व्या वित्त आयोगाकडून विविध टप्प्यातील मंजूर/प्राप्त अनुदानाच्या वाटपा संदर्भात तसेच, काम निहाय यादीस मंजूरी देणेबाबत मा.महापौर व मा.सभापती,स्थायी समिती यांचे अध्यक्षतेखाली दि.०३/०५/२०१२ रोजी बैठक आयोजित करणेत आली होती. बैठकीस उपायुक्त सांगली, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण तसेच, वैद्यकीय आरोग्याधिकारी हे उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये महापालिकेच्या सन्मा.सदस्य व नागरीकांकडून प्राप्त होणाऱ्या मागणीचा व प्रत्यक्षात कामाच्या निकडीचा विचार करुन चर्चेअंती विविध टप्प्यातील प्राप्त अनुदानाचे वाटप खालील प्रमाणे करणेस निर्देशित करणेत आले. त्यास ही सभा सहमती दर्शवित आहे.

१३ व्या वित्त आयोग तिसरा टप्पा आयोगांतर्गत प्राप्त अनुदान रु.२,६४,०४,४२८/- मात्रचे अनुदान वाटप खालील प्रमाणे करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. युआयडीएसएसएमटी अंतर्गत महापालिकेचा हिस्सा :- १ कोटी

२. जलनि:सारण विभाग :- २३ लक्ष

३. सार्व.बांधकाम विभाग :- १.४१ कोटी

उपरोक्त वाटपानुसार जलनि:सारण व बांधकाम विभागास देणेत येणारे अनुदान रु.१,६४,०४,४२८/- मधून महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यास ड्रेनेज लाईन टाकणे व रस्त्याची सुधारणा करणेची प्रस्तावित करणेत आलेली खालील ११ कामे करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजयत्रकीय रक्कम रुपये
	जलनि:सारण विभाग	
१.	सांगली येथील शामरावनगर परिसर भंडग कारखाना ते १०० फुटी ड्रेनेज पाईप लाईन टाकणे	२३,००,०००/-
	एकूण	**२३,००,०००/-**
	बांधकाम विभाग	
१.	सांगली येथील वॉर्ड क्र.६८ हनुमान नगर गल्ली नं.१,२,३,४ चे सांडपाणी निचऱ्यासाठी पु.प.मुख्य डी.पी.रस्त्यास आर.सी.सी.गटर करणे	११,९०,७००/-
२.	सांगली येथील वॉर्ड्स क्र.६८ हनुमान नगर गुलाब कॉलनीचे गटार पासून पुर्वेकडे पु.प.मुख्य डी.पी.रस्त्यास आर.सी.सी.गटर करणे.	१०,१९,९००/-
३.	मिरज येथील पंढरपुर रोड स्मशानभुमी मध्ये गॅलरी बांधणे.	१०,००,०००/-

... २ ...

४.	सांगली येथील अहिल्यादेवी होळकर चौक ते साखर कारखाना कंपौड पर्यंतच्या द.उ.१०० फुटी रस्त्याची (अंशत:भाग) दुरुस्ती करणे.	२५,००,०००/-
५.	सांगलीवाडी भारती विद्यापिठ जवळील द.उ.रस्त्याची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरणाने सुधारणा करणे.	९,९७,१००/-
६.	कुपवाड प्रभागातील यशवंतनगर बसस्टॉप ते आंबा चौका पर्यत पू.प.१०० फुटी रस्ता डांबरीकरण करणे.	१४,९९,७००/-
७.	कुपवाड प्रभागातील अहिल्यादेवी मल्हारराव होळकर चौक ते विजयनगर रेल्वेपुल पर्यतच्या रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.	१४,९८,०००/-
८.	कुपवाड प्रभागातील नांदणीकर मळा ते खरे घर ४० फुटी डी.पी.रस्त्या पर्यतच्या रस्त्याची सुधारणा करणे.	१०,४७,४००/-
९.	मिरज गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहती मधील पवार पाईप इंडस्ट्रीज ते मिरज कुपवाड रोड व महाबळ ऑटो समोरील रस्ता हॉटमिक्स करणे.	८,९८,१००/-
१०.	सांगली येथील राममंदिर रोड ते हिराबाग चौक पर्यत पंचमुखी मारुती रोड रस्त्याची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरणाने सुधारणा करणे	२४,५३,५५०/-
	एकूण -	**१,४१,०४,४५०/-**
	जलनि:सारण व बांधकाम विभाग - एकूण -	**१,६४,०४,४५०/-**

१३ व्या वित्त आयोगातील चौथा टप्पा अंतर्गत प्राप्त अनुदान रु.८९,९०,३९५/- मात्रचे अनुदानातून भूसंपादनासाठी (दुर्गानगर स.नं.९४०/१,२ मधील एम आय डी सी मधील झोपडपट्टीची जागा)र.रु. ४५ लक्ष व लोकआयुक्त दाखला स.स.न.र.(दाव्यासाठी) र.रु. ४४ लक्ष असे वाटप करणेस प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तथापि,दुर्गानगर झोपडपट्टीची जागा एम आय डी सी कडून संपादित करणेस मा.महासभा ठराव क्र. २८ दि.१९/०५/२०१२ अन्वये प्रस्ताव रद्द करणेत आला असलेने सदरच्या रु.४५ लक्ष रक्कमेतून खालील कामे करावीत असे ही सभा सूचित करीत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रुपये
१.	मिरज येथील वॉर्ड क्र.२५ हरिमंदिर ते लोंढे घर ते वसगडेकर घर एल टाईप रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरणाने सुधारणा करणे	१८,८९,१००/-
२.	वॉर्ड क्र.३० आपटा पोलिस चौकी ते कॉलेज कॉर्नर रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरणाने सुधारणा करणे	१५,२५,७००/-
३.	सांगली येथील वॉर्ड.५६ लोकमान्य चौक ते कृष्णा हॉस्पीटल द+उ रस्ता बी.बी.एम. डांबरी करणे.	८,१९,५००/-
४.	वॉ.क्र.६० मिरज येथील गुरुवार पेठ सौदागर गल्ली येथे पत्र्याचे शेड मारणे.	२,६५,७००/-

व उर्वरित रु.४४ लक्ष अनुदान लोकआयुक्त दाखला स.स.न.र. दाव्यासाठी वाटप करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, १३ व्या वित्त आयोगातील पाचवा टप्पा अंतर्गत प्राप्त झालेल्या र.रु.२,६९,०१,५०४/- मात्रचे अनुदानामधून खालील प्रमाणे प्रस्तावानुसार अनुदान वाटप करणेस ही सभा सहमती दर्शवित आहे.

१. पाणी पुरवठा विभाग र.रु.५० लक्ष

२. आरोग्य विभाग र.रु ५० लक्ष

३. सार्व.बांधकाम विभाग र.रु.१.६९ कोटी

उपरोक्त प्रमाणे वाटप करणेत आलेल्या बांधकाम विभागाकडील र.रु.१,६९,००,०००/- मात्रच्या अनुदानामधून सन्माननीय सदस्य यांचे मागणी नुसार प्रस्तावित करणेत आलेली रस्त्यांची सुधारणा व दफन भूमी विकसीत करणेची खालील एकूण १७ कामे करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रुपये
	बांधकाम विभाग	
१.	सांगली वॉर्ड क्र.२३ मधील उर्मिलानगर मध्ये गटार करणे	५,६०,४००/-
२.	सांगली वॉर्ड क्र.१४ साईनगर गटर करणे	९,००,०००/-
३.	कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.२९ मधील समृद्धीनगर टी.के.पाटील सोसायटी अंतर्गत रस्ते काँक्रिटचे करणे	२,३५,७००/-
४.	कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.२९ मधील महात्मा गांधी कॉलनी मधील शकील मुजावर घर ते जांभळेकर घरापर्यतचा अंतर्गत रस्ते बी.बी.एम.डांबरी करणे	४,६४,३००/-
५.	सांगली येथील वॉर्ड क्र.३ माधवनगर रोड पुर्व बाजू जकात नाका नजीक मुजावर बॅरेल ते कांबळे घर परिसरातील रस्ते बी.बी.एम.सीलकोट व मुरुम,खडीकरण करणे	४,९५,९००/-
६.	सांगली अहिल्यादेवी होळकर चौक ते कारखाना पर्यत मुख्य द.उ. १०० फुटी डी.पी.रस्त्यास गटार करणे (भाग-१) दक्षिण भाग	१२,५५,१००/-
७.	सांगली अहिल्यादेवी होळकर चौक ते कारखाना पर्यत मुख्य द.उ. १०० फुटी डी.पी.रस्त्यास गटार करणे (भाग-२) उत्तर भाग	१०,११,३००/-
८.	कुपवाड प्रभांगातील वॉर्ड क्र.४६ मधील समता नगर गल्ली क्र.१ मधील समीर शिकलगार घर ते निमुदीन जलाल घरापर्यतचा रस्ता डांबरी करणे.	६,६७,३००/-
९.	कुपवाड प्रभागातील भारत सुतगिरणी ते कुपवाड ते एम आय डी सी नाक्या पर्यतच्या मुख्य रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.	२४,६६,५००/-
१०.	सांगली येथील गर्व्हमेंट कॉलनी स्फुर्ती चौक स्वननगरी जवळील द.उ.रस्त्याची मुरुमीकरणाने सुधारणा करणे.	४,९८,२००/-
११.	कुपवाड सि.स.नं.५०६/२/२/ड/२ मधील खोजा समाज व मुस्लीम स्मशानभूमी विकसीत करणे	४,९८,९००/-
१२.	मिरज येथील कृष्णाघाट स्मशानभूमी येथे सुधारणा करणे	३,९९,३००/-
१३.	मिरज येथील लक्ष्मी मार्केट ते बाँम्बे बेकरी व्हाया सराफ कट्टा पर्यतच्या एल टाईपच्या रस्त्याची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरणाने सुधारणा करणे.	१९,५५,०००/-
१४.	कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्र.२८ मधील वारणाली गल्ली नं.३ ब च्या पुर्व बाजूस गटर करणे.	९,०८,५००/-
१५.	मिरज येथील भोकरे गल्ली-बानुगडे गल्ली,सावंत लाऊड स्पिकर घर रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	१३,९१,९००/-
१६.	सांगली विश्रामबाग इन्टेक भवन समोरील यु.प.डी.पी.रस्ता सुधारणा करणे.	२१,९३,१००/-
१७.	सांगली वॉर्ड क्र.५२ सम्राट व्यायाम मंडळ पिछाडीचा द.उ.रस्ता डांबरी करणे.	९,९८,६००/-
	एकूण -	**१,६९,००,०००/-**

उपरोक्त प्रमाणे वाटप करणेत आलेल्या सर्व कामांची निविदा प्रक्रिया प्रशासनाने तातडीने राबवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,